"कलम 19 अधिसूचना"

क्रमांक कावि/भूसंपादन/इवद/ 1015 /2019.
भूसंपादन विभाग इमारत व दळणवळण
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा
दिनांक :- 29 / 05 /2019.

**क्रमांक : भूसंपादन प्रकरण क्रमांक 15/2000-2001/मौजे इस्लामपुर ता. जळगांव जामोद**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम 11 च्या पोटकलम (1) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक 901 दिनांक 21/10/2016 अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे,

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्हयाच्या) जिल्हाधिका-याने, कलम 15 च्या पोटकलम (2) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे,

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे जमिनीचे असल्यामुळे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून घोषीत करण्याची तसेच पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दीष्ट करण्याची आवश्यकता नाही,

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) (इमारत व दळणवळण) बुलडाणा, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - 1**

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक 15/2000-2001/मौजे इस्लामपुर ता. जळगांव जामोद

| अनुक्रमांक | गट नंबर | लागवडयोग्य क्षेत्र (हे.आर) | पोटखराब क्षेत्र (हे.आर) | एकुण क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|
| 1 | 204 अ | 0.02 | 0 | 0.02 |
| 2 | 204 ब | 0.02 | 0 | 0.02 |
| 3 | 203 | 0.36 | 0 | 0.36 |
| 4 | 199 | 0.41 | 0 | 0.41 |
| 5 | 153 | 0.09 | 0 | 0.09 |
| 6 | 154 | 0.29 | 0 | 0.29 |
| 7 | 155 | 0.2 | 0 | 0.2 |
| 8 | 158 | 0.25 | 0 | 0.25 |
| 9 | 157 | 0.18 | 0 | 0.18 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | 159 | 0.12 | 0 | 0.12 |
| 11 | 146 | 0.1 | 0 | 0.1 |
| 12 | 160 | 0.07 | 0 | 0.07 |
| 13 | 145 | 0.11 | 0 | 0.11 |
| 14 | 162 | 0.07 | 0 | 0.07 |
| 15 | 144 | 0.13 | 0 | 0.13 |
| 16 | 163 | 0.13 | 0 | 0.13 |
| एकुण | | 2.55 | 0 | 2.55 |

**अनुसूची - 2**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव - मोहिदेपुर इस्लामपुर रस्ता

प्रकल्पकार्याचे वर्णन - मोहिदेपुर इस्लामपुर ग्रा.मा.-63 रस्त्याच्या बांधकामाकरीता

समाजाला मिळणारे लाभ -

या रस्त्यामुळे सदर गावातील नागरीकांचे दळणवळणाकरीता व शेतीचा माल बाजारपेठेत नेण्याकरीता तसेच शैक्षणीक व आरोग्य सुविधा उपलब्ध होतील. व ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

**अनुसूची - 3**

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

संपादीत होत असलेले क्षेत्र हे जमिनीचे आहे.

**अनुसूची -4**

संपादीत होत असलेले क्षेत्र हे जमिनीचे असल्यामुळे पुनर्वसन आराखडयाची आवश्यकता नाही.

दिनांक :- 29 /05 /2019.

ठिकाण : बुलडाणा.

(डॉ. निरुपमा डांगे)

जिल्हाधिकारी बुलडाणा